**अनुसूचित क्षेत्रातील (पेसा) गाव घोषित करण्यासाठी मार्गदर्शक सुचना निर्गमित करणेबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः व्हीपीएम-२६१४ / प्र.क्र.१३४/पंरा-४**
**२५, बांधकाम भवन, मर्झबान रोड**
**फोर्ट, मुंबई-४०० ००१**
तारीख: **१९ मे २०१५**

**प्रस्तावना :-**

पंचायत विस्तार (अनुसूचित क्षेत्र) अधिनियम सन १९९६ मध्ये केंद्र शासनाने पारित केला आहे. या अधिनियमात नमुद केल्याप्रमाणे, अनुसूचित क्षेत्रात लागु असणारे राज्य शासनाचे सर्व नियम, अधिनियम, आदिवासींच्या सामाजिक रुढी, प्रथा, परंपरा, धार्मिक रुढी, प्रथा, परंपरा व त्यांच्या परंपरागत व्यवस्थापन पध्दतीस अनुरुप असतील.

पेसा अधिनियमान्वये संबंधित ग्रामपंचायत आणि ग्राम सभांना स्व-शासनाबाबत अनेकविध अधिकार देण्यात आले आहेत. पेसा अधिनियमाच्या कलम ४ (ख) नुसार गाव हे सर्व साधारणपणे वस्ती किंवा वस्तींचा समुह किंवा पाडा किंवा पाडयांचा समुह, वाडी किंवा वाडयांचा समुह असेल आणि ते त्यांच्या रुढी आणि परंपरानुसार त्यांच्या कामाचे किंवा त्यांच्या कार्याचे व्यवस्थापन करत असतील. अधिनियमाच्या कलम ४ (ग) नुसार प्रत्येक गावाला ग्रामसभा असेल. त्यानुसार, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम भाग ।।। क मध्ये कलम ५४-१ (क) अंतर्भूत करण्यात आले आहे. पाडा आणि वस्तींना स्वतंत्र गाव होणे आणि, अशा प्रत्येक गावाला ग्रामसभा असणे यासाठी परवानगी देण्यात आली आहे. एका ग्रामपंचायतीमध्ये एक अथवा अनेक गावे असू शकतील असेही नमुद केले आहे.

पंचायत विस्तार (अनुसूचित क्षेत्र) अधिनियमांतर्गत, अनुसूचित क्षेत्रासाठी नियम तयार करण्यात आले असून दि.४ मार्च २०१४ रोजी प्रसिध्द करण्यात आले आहेत. पेसा अधिनियम व त्याअंतर्गत तयार करण्यात आलेल्या नियमातील नियम-४ अन्वये अनुसूचित क्षेत्रासाठी गाव घोषित करण्याची तरतुद करण्यात आली आहे, तथापि गाव घोषित करतांना गावाच्या हद्दीबाबत येणा-या अडचणी विचारात घेता, याबाबत मार्गदर्शक सुचना निर्गमित करणे शासनाच्या विचाराधीन होते; ही बाब विचारात घेऊन या शासन निर्णयान्वये खालीलप्रमाणे मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय:-**

१. पंचायत विस्तार अधिनियमाअंतर्गत (महाराष्ट्र ग्रामपंचायती संबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रावर विस्तारीत करण्याबाबत) नियम २०१४) पेसा नियमांच्या- नियम ४ च्या तरतुदीनुसार गाव घोषित करण्यात यावे.

२. पंचायत विस्तार अधिनियमामध्ये अथवा पेसा नियमामध्ये लोकसंख्येचे निकष नसल्याने, अनुसूचित क्षेत्रातील वाडी/वाडयांचा समुह, वस्ती/वस्त्यांचा समुह, पाडा/पाडयांच्या समुह गाव म्हणुन घोषित करता येईल.

३. वाडी/वाडयांचा समुह, वस्ती/वस्त्यांचा समुह, पाडा/पाडयांच्या समुहातील पात्र मतदारांच्या ५०% किंवा त्यापेक्षा जास्त मतदारांनी ठराव करुन, गाव घोषित करण्यासाठी इच्छा प्रदर्शित केली तर अशा वाडया-वाडयांचा समुह, वाडी/वाडयांचा समुह, वस्ती/वस्त्यांचा समुह, पाडा/पाडयांच्या समुह यांना गाव घोषित करता येईल.

४. यापूर्वीच दि.९.५.२०१४ च्या पत्रान्वये देण्यात आलेल्या सुचनेप्रमाणे यासाठी आयोजित केलेल्या सभेत ग्रामसेवक अथवा इतर शासकीय कर्मचारी, सचिव म्हणुन काम पाहील.

५. गाव घोषित करण्यासाठी आयोजित केलेल्या सभेत ठराव मंजूर केल्यानंतर सदर वाडी/वाडयांचा समुह, वस्ती/वस्त्यांचा समुह, पाडा/पाडयांच्या समुह, ज्या उपविभागीय अधिका-यांच्या कार्यकक्षेत येत असेल त्यांना सदर ठरावाची मुळ प्रत ग्रामसभेचा सचिव पाठवेल. ठरावाची दुसरी प्रत जिल्हाधिकारी यांना पाठविण्यात येईल व ठरावाची एक प्रत कार्यालयीन प्रत म्हणुन निवड नस्तीत ठेवण्यात येईल.

६. ठरावाचा नमुना **अनुसूची-I** मध्ये नमुद केला आहे.

७. ज्या वाडी/वाडयांचा समुह, वस्ती/वस्त्यांचा समुह, पाडा/पाडयांच्या समुह यांना नियम-४ अंतर्गत गाव म्हणुन घोषित करावयाचे असेल, त्यांनी ठरावामध्ये खालील बाबींचा समावेश करावा.

   I. प्रस्तावित गावाच्या हद्दीतील सर्वसाधारण क्षेत्र.
   II. गावाच्या क्षेत्रातील जल-साठयांचा हद्दी
   III. वन क्षेत्राच्या परंपरागत वापराच्या हद्दी याबाबतचे विस्तृत विवरण आणि वनाचे विभाग (Forest Compartment) चे विवरण
   IV. ज्या वनांमध्ये गौणवनोपज परंपरागत पध्दतीने मिळविला जातो किंवा मिळवला जात होता किंवा वापर करण्याचा उद्देश आहे, अशा वनांच्या सर्वसाधारण हद्दीबाबत विस्तृत माहिती देणे.
   V. इतर नैसर्गिक स्त्रोत वापराच्या परंपरागत हद्दी असतील त्यांच्या सर्वसाधारण हद्दीबाबत विस्तृत माहिती देणे. (उदा.गौण खनिजे- Minor Mineral)
   VI. वरील क्षेत्र निश्चित केल्यानंतर त्याबाबतचा ढोबळ नकाशा शक्यतो जोडावा.
   VII. वरील हद्दीबाबतचा नकाशा तयार करण्यासाठी व पुढील कार्यवाहीसाठी क्षेत्रीय/ स्थानिक अधिकारी सचिवांना मदत करतील.

८. वाडी/वाडयांचा समुह, वस्ती/वस्त्यांचा समुह, पाडा/पाडयांच्या समुह यांनी गाव जाहीर करणेबाबत केलेला ठराव सचिवांकडुन प्राप्त झाल्यानंतर उपविभागीय अधिकारी त्यास व्यापक प्रसिध्दी देतील. त्यानंतर वाडया-वस्त्या-पाडयांच्या नोंदणीकृत मतदारांची बैठक बोलावुन त्यावर चौकशी करतील. (त्याबाबतचा नमुना **अनुसूची - II** प्रमाणे राहील.)

९. ठरावाची शहानिशा केल्यानंतर उपविभागीय अधिकारी स्थानिक अधिका-यांच्या व संबंधित वाडी/वाडयांचा समुह, वस्ती/वस्त्यांचा समुह, पाडा/पाडयांच्या समुहातील वयोवृध्द नागरिकांच्या मदतीने वाडी/वाडयांचा समुह, वस्ती/वस्त्यांचा समुह, पाडा/पाडयांच्या समुह यांचे सर्वे नंबर व वनांचे

गट क्रमांक (Forest Compartment) तसेच संबंधित वाडी/वाडयांचा समुह, वस्ती/वस्त्यांचा समुह, पाडा/पाडयांच्या समुहातील पारंपारिक नैसर्गिक स्त्रोत आणि इतर भौतिक हद्दी निश्चित करतील जेणे करुन संबंधित वाडी/वाडयांचा समुह, वस्ती/वस्त्यांचा समुह, पाडा/पाडयांच्या समुह यांना गाव जाहीर करता येईल.

१०. त्यानंतर उपविभागीय अधिकारी अनुसूची-III मध्ये नमुद केल्याप्रमाणे गाव जाहीर करण्यासाठी जिल्हाधिका-यांकडे शिफारस करतील.

११. उपविभागीय अधिका-यांकडुन गाव जाहीर करण्यासंदर्भात ठराव वजा शिफारस प्राप्त झाल्यानंतर त्या ठरावावर जिल्हाधिकारी ४५ दिवसांत निर्णय घेतील. यासंदर्भात पेसा नियमाच्या नियम ४ च्या उपनियम २,३ व ४ प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

१२. ज्या वाडी/वाडयांचा समुह, वस्ती/वस्त्यांचा समुह, पाडा/पाडयांच्या समुह यांच्याकडुन प्राप्त झालेल्या ठरावाबाबत जिल्हाधिकारी यांची खात्री झाल्यानंतर अशा वाडी/वाडयांचा समुह, वस्ती/वस्त्यांचा समुह, पाडा/पाडयांच्या समुहाच्या ठरावावर उपविभागीय अधिकारी यांच्याकडुन प्राप्त अहवालावर जिल्हाधिकारी आपली शिफारस विभागीय आयुक्तांकडे करतील. **(अनुसूची IV)**

**१३. हा शासन निर्णय निर्गमित होण्यापुर्वी गाव निर्मिती बाबत वर उल्लेखलेल्या बाबींपैकी ज्या बाबी पुर्ण झाल्या असतील त्या वगळुन पुनरावृत्ती टाळण्यासाठी संपुर्ण प्रक्रिया पुनश्च करण्याऐवजी उर्वरित बाबी पुर्ण कराव्यात. तसेच ज्या ठिकाणी फक्त नैसर्गिक पारंपारिक सीमा घोषित करण्याचे काम शिल्लक असेल त्याठिकाणी वाडी-वस्ती-पाडे यांनी पारंपारिक सीमा ठरवुन त्या नकाशामध्ये दर्शवुन आणि हद्दीचा तपशिल नमुद करुन ठरावासह उपविभागीय अधिका-यांकडे पाठवाव्यात आणि उपविभागीय अधिकारी योग्य ती खात्री करुन सीमांकित नकाशा आणि इतर तपशिल जिल्हाधिका-यांकडे पाठवतील.**

१४. विभागीय आयुक्त त्यावर नमुना **अनुसूची** V मध्ये नमुद केल्याप्रमाणे अधिसुचना काढतील.

**१५.** वाडी/वाडयांचा समुह, वस्ती/वस्त्यांचा समुह, पाडा/पाडयांच्या समुह यांना गाव जाहीर केल्यानंतर जाहीर केलेल्या गावांचे क्षेत्र वगळुन उरलेले क्षेत्र मुळ गावाच्या हद्दीत असेल. या गावासाठी पेसा अधिनियम व नियमातील तरतुदी लागु राहतील व त्यांचे अधिकार अबाधित राहतील.

अनुसूचित क्षेत्रातील वाडी/वाडयांचा समुह, वस्ती/वस्त्यांचा समुह, पाडा/पाडयांच्या समुह यांच्या प्रथा, परंपरा जतन करण्यासाठी पेसा नियम ४ प्रमाणे जाहीर केलेले गाव आणि महसुली गाव हया दोन वेगवेगळया संकल्पना आहेत याबाबत स्पष्टता ठेवावी .

### विवाद निर्माण झाल्यास अनुसरावयाची कार्यपध्दती

एखादया प्रकरणी एकापेक्षा अधिक वाडी/वाडयांचा समुह, वस्ती/वस्त्यांचा समुह, पाडा/पाडयांच्या समुह यांनी एकाच वनाचे विभाग (Forest Compartment) अथवा सर्वे नंबरवर अथवा जलसाठयाचे क्षेत्रावर दावा केल्यास आणि त्यासंदर्भातील दावे उपविभागीय अधिका-याकडे प्रलंबित असल्यास, उपविभागीय अधिका-याने संबंधित ठिकाणाला पोलीस पाटील, कोतवाल, ग्रामसेवक,

तलाठी, वनपाल आणि संबंधित वाडी/वाडयांचा समुह, वस्ती/वस्त्यांचा समुह, पाडा/पाडयांच्या समुहातुन कमीत कमी पाच अनुसूचित जमातीचे नागरिकांसह भेट देवुन याबाबतचा विवाद मिटवावा.

उपविभागीय अधिकारी याविवादासंदर्भाच्या वस्तुस्थितीबददल आपले स्पष्ट अभिप्राय जिल्हाधिका-यांकडे विचारार्थ पाठवतील आणि जिल्हाधिका-यांनी याबाबत घेतलेला निर्णय अंतिम असेल.

उपरोक्त निर्णय घेतांना वाडया-वस्त्या-पाडयांकडुन वरील वनाचे विभाग (Forest Compartment) अथवा सर्वे नंबर अथवा जलसाठे अथवा इतर नैसर्गिक साधन संपत्तीबाबत भविष्यात करण्यात येणा-या वापराऐवजी सदर विवादास्पद नैसर्गिक हक्क सद्दस्थितीत ज्यांच्या वापरात आहेत त्या वाडी/वाडयांचा समुह, वस्ती/वस्त्यांचा समुह, पाडा/पाडयांच्या समुह यांना प्राधान्य देण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०४२२१४१६१२५०२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

V Giriraj

Digitally signed by V Giriraj
DN: c=IN, o=All India Service, ou=Principal Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=V Giriraj
Date: 2015.05.19 17:31:28 +05'30'

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव,

२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,

३. मा.मंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव,

४. मा.राज्यमंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव,

५. मा.मुख्यसचिव, महाराष्ट्र शासन

६. मा.प्रधान सचिव (आदिवासी विकास), मंत्रालय, मुंबई.

७. मा. सचिव (वने), मंत्रालय, मुंबई.

८. सर्व विभागीय आयुक्त,

९. जिल्हाधिकारी, ठाणे, पालघर, नाशिक, नंदुरबार, धुळे, अहमदनगर, जळगाव, अमरावती, यवतमाळ, चंद्रपुर, गडचिरोली, पुणे, नांदेड.

१०. मुख्य कार्यकारी अधिकारी, ठाणे, पालघर, नाशिक, नंदुरबार, धुळे, अहमदनगर, जळगाव, अमरावती, यवतमाळ, चंद्रपुर, गडचिरोली, पुणे, नांदेड.

११. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं), ठाणे, पालघर, नाशिक, नंदुरबार, धुळे,अहमदनगर, जळगाव, अमरावती, यवतमाळ, चंद्रपुर, गडचिरोली, पुणे, नांदेड.

१२. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, ठाणे, पालघर, नाशिक, नंदुरबार, धुळे, अहमदनगर, जळगाव, अमरावती, यवतमाळ, चंद्रपुर, गडचिरोली, पुणे, नांदेड. (जिल्हयातील सर्व तालुके)

१३. निवडनस्ती, पं.रा.-२

अनुसूची -I

क्रमांक:- / प्रक्र /
दिनांक:

**महाराष्ट्र ग्रामपंचायती संबंधीचे उपबंध (अनुसुचित क्षेत्रावर विस्तारीत करण्याबाबत) नियम, २०१४ अंतर्गत नियम ४ अन्वये गाव जाहिर करण्यासंदर्भात ठरावाचा नमुना**

**प्रति,**
**उपविभागीय अधिकारी**
**------------------------------**

ज्या अर्थी ----------------------- पाडा / वस्ती / पाडयांचा समुह/ वस्त्यांचा गट परंपरा व रुढी यांनुसार आपले व्यवहार चालविणारा जनसमाजाचा अंतर्भाव आहे, आणि ज्या अर्थी, आम्ही,--------- ग्रामपंचायत अंतर्गत येणारा ------------------- पाडा / वस्ती / पांडयांचा समुह / वस्त्यांचा समुह, यांच्या मतदारांचे मत झाले आहे की, महाराष्ट्र ग्रामपंचायती संबंधीचे उपबंध (अनुसुचित क्षेत्रावर विस्तारीत करण्याबाबत) नियम,२०१४ च्या नियम ४ प्रमाणे आमचा पाडा/ वस्ती /पाडयाचा समुह /वस्त्यांचा समुह यांना गाव घोषित करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, आम्ही खालील स्वाक्षरी करणारे मतदार हा ठराव मंजुर करतो आणि विनंती करतो की, ------------ ग्रामपंचायती अंतर्गत येणारा ------------ पाडा / वस्ती / पांडयांचा समुह / वस्त्यांच्या समुहाला गाव म्हणून घोषित करावे.

प्रस्तावित गावाच्या परंपरागत हद्दी व याहद्दीत येणारे नैसर्गिक स्त्रोतांचा ढोबळ नकाशा व त्याबाबतचा विस्तृत तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ) वाडया-वस्त्या-पाडयांची परंपरागत हद्द, त्याबाबतचा तपशिल आणि ओळखीच्या खुणा

ब) वाडया-वस्त्या-पाडे ज्या परंपरागत हद्दीतुन गौण वनउपजे प्राप्त करुन घेण्यात येत होते किंवा येत आहेत अशा वनांचा तपशिल

क) वाडया-वस्त्या-पाडे ज्या परंपरागत हद्दीतुन नैसर्गिक स्त्रोत प्राप्त करुन घेण्यात येत आहेत किंवा घेत होते अशा नैसर्गिक स्त्रोतांचा तपशिल.

ड) वाडया-वस्त्या-पाडयांकडुन सामुहिकरित्या वापरात येत असलेल्या इतर काही बाबी असल्यास त्याचा विस्तृत तपशिल खाली नमुद करावा.

इ) नमुद करणे आवश्यक असलेले इतर मुद्दे .

ई) वरील तपशिलाच्या संदर्भातील ढोबळ मानाने हाताने काढलेले चित्र खालिलप्रमाणे असेल.

******* नकाशा *********

आम्ही खालील सहया करणारे, प्रमाणित करतो की वरिल देण्यात आलेली माहिती खरी असुन वापरात येणारे परंपरागत नैसर्गिक स्त्रोत आमच्या पारंपारिक नियमाप्रमाणे, सामाजिक, धार्मिक परंपरा, परंपरागत प्रथाप्रमाणे आहे.

------------ ग्रामपंचायती अंतर्गत येणारा ------------ पाडयाचे /वस्तीचे /पांडयाचा समुहाचे/वस्त्यांच्या समुहाचे एकूण मतदार --------

- वरील ठरावाच्या बाजूने असलेल्या पाडयांची /वस्तीची /पांडयाच्या समुहाची /वस्त्यांच्या समुहाची एकुण मतदार संख्या ---

प्रत :-

१) मा.जिल्हाधिकारी यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषीत

२) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. ------------

३) गटविकास अधिकारी पंचायत समिती ------------

४) सचिव, ग्रामसेवक/ ग्राम विकास अधिकारी ग्रामपंचायत ----------

## अनुसूची-II
## (सभेच्या सुचनेचा नमुना)

**महाराष्ट्र ग्रामपंचायती संबंधीचे उपबंध (अनुसुचित क्षेत्रावर विस्तारीत करण्याबाबत) नियम, २०१४ अंतर्गत नियम ४ अन्वये गाव जाहीर करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या सभेची सुचना**

**जा.क्रमांक:- / ग्रा.पं**

**दिनांक:**

**विषय:- दि.------------ रोजी घेण्यात येणा-या महाराष्ट्र ग्रामपंचायती संबंधीचे उपबंध (अनुसुचित क्षेत्रावर विस्तारीत करण्याबाबत) नियम, २०१४ मधील नियम ४ अन्वये गाव जाहीर करण्यासाठी आयोजित केलेल्या सभेस उपस्थित रहाणे बाबत**

**महोदय,**

दिनांक ---------------- रोजी ग्रामपंचायत ---------ची महाराष्ट्र ग्रामपंचायती संबंधीचे उपबंध (अनुसुचित क्षेत्रावर विस्तारीत करण्याबाबत) नियम,२०१४ मधील नियम ४ अन्वये गाव जाहिर करण्यासंदर्भात पाडा / वस्ती / पाडयांचा समुह / वस्त्यांच्या समुहाला गाव जाहीर करण्यासाठी सभा आयोजित करण्यात आली आहे.

सभेचा दिनांक व वेळ -------------------

सभेचे ठिकाण (जे ठिकाण गाव म्हणुन जाहीर करावयाचे आहे त्या पाडा / वस्ती / पाडयांचा समुह / वस्त्यांचे ठिकाण असेल) --------------------

सभेची विषयपत्रिका :

१)---------- पाडा / वस्ती / पाडयांचा गट/ वस्त्यांच्या समुहाला गाव जाहीर करणेबाबत ठराव घेणे.

२)

३)

पाडा / वस्ती / पाडयांचा समुह / वस्त्यांच्या समुहाचे मतदार बंधु /भगिनींना कळविण्यात येते की, वरील सभेस उपस्थित राहुन - पाडा / वस्ती / पांडयांचा समुह / वस्त्यांच्या समुहाला गाव जाहीर करण्यासाठी सहकार्य करावे. अशी विनंती आहे.

आपला /आपली,

ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी/ इतर प्रशासकिय अधिकारी/सचिव

पाडा / वस्ती / पांडयांचा समुह / वस्त्यांच्या समुहाचे नाव

ग्रामपंचायत -------- तालुका ------ जिल्हा------

**प्रति,**

**श्री/श्रीम -----------------------**

**पाडा / वस्ती / पाडयांचा समुह / वस्त्यांचे मतदार**

**अनुसूची-III**

**महाराष्ट्र ग्रामपंचायती संबंधीचे उपबंध (अनुसुचित क्षेत्रावर विस्तारीत करण्याबाबत) नियम, २०१४ अंतर्गत नियम ४(२) अन्वये गाव जाहीर करण्यासाठी जिल्हाधिका-यांकडे उपविभागीय अधिका-यांनी पाठवावयाच्या अहवालाचा नमुना**

**प्रति,**

**जिल्हाधिकारी**

**----------------------**

ज्या अर्थी ----------------------- ग्रामपंचायतीतील -------------------पाडा / वस्ती / पाडयांचा समुह / वस्त्यांचा समुह यांनी महाराष्ट्र ग्रामपंचायती संबंधीचे उपबंध (अनुसुचित क्षेत्रावर विस्तारीत करण्याबाबत) नियम, २०१४ च्या नियम ४ प्रमाणे दिनांक ------------ रोजी गाव जाहीर करण्यासंदर्भात ठराव केलेला आहे.

आणि ज्याअर्थी यासंदर्भात मी खालील सही करणार, श्री/श्रीम------------------- दिनांक ------------ रोजी ----------- ग्रामपंचायतीत येणा-या पाडा / वस्ती / पाडयांचा समुह / वस्त्यांचा समुह यांची संबंधित नोंदणीकृत मतदार व स्थानिक अधिका-यांच्या उपस्थितीत चौकशी केली आहे.

आणि त्याअर्थी संबंधित चौकशीअंती पाडा / वस्ती / पाडयांचा समुह / वस्त्यांचा समुह गाव घोषित करण्यास पात्र आहे. (चौकशी अहवालाची प्रत सोबत जोडली आहे)

मी--------------------- उपविभागीय अधिकारी --------------- म्हणुन संबंधित---------------------- पाडा / वस्ती / पांडयांचा समुह / वस्त्यांचा समुह पेसा नियम -४ प्रमाणे गाव घोषित करण्याची शिफारस करीत आहे.

सर्व सर्वे क्रमांक, विभाग क्रमांक आणि इतर हद्दीच्या संदर्भातील विस्तृत तपशिल तसेच नकाशा सोबत जोडला आहे.

| अ.क्र. | हद्दीचे तपशिल | समुह नंबर/ कम्पार्टमेन्ट नंबर | इतर खुणा (आवश्यक असल्यास) |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |

असेही प्रस्तावित करण्यात येते की, वाडया-वस्त्या-पाडयांना गाव जाहीर केल्यानंतर
जाहीर केलेल्या गावांचे क्षेत्र वगळुन उरलेल्या क्षेत्र मुळ गाव म्हणुन ओळखले जाईल. या गावासाठी पेसा अधिनियमातील तरतुदी व नियमातील तरतुदी लागु राहतील व त्यांचे अधिकार अबाधित राहतील.

**स्वाक्षरी**

**दिनांक :** **उपविभागीय अधिकारी**

## अनुसूची-IV

**<u>महाराष्ट्र ग्रामपंचायती संबंधीचे उपबंध (अनुसुचित क्षेत्रावर विस्तारीत करण्याबाबत) नियम, २०१४ अंतर्गत नियम ४(४) अन्वये गाव जाहीर करण्यासाठी जिल्हाधिका-यांनी विभागीय आयुक्तांकडे करावयाच्या शिफारशीचा नमुना</u>**

**प्रति,**

**विभागीय आयुक्त**

**-----------------------**

ज्या अर्थी ----------------------- ग्रामपंचायतीतील ----------------पाडा / वस्ती / पाडयांचा समुह / वस्त्यांचा समुह यांनी महाराष्ट्र ग्रामपंचायती संबंधीचे उपबंध (अनुसुचित क्षेत्रावर विस्तारीत करण्याबाबत) नियम, २०१४ च्या नियम ४ प्रमाणे दिनांक ------------ रोजी गाव जाहीर करण्यासंदर्भात ठराव केलेला आहे.

आणि ज्याअर्थी यासंदर्भात उपविभागीय अधिकारी, श्री/श्रीम-------------यांनी--------------- दिनांक --------रोजी ----------- ग्रामपंचायतीत येणा-या पाडा / वस्ती / पाडयांचा समुह / वस्त्यांचा समुह यांची संबंधित नोंदणीकृत मतदार व स्थानिक अधिका-यांच्या उपस्थितीत चौकशी केली आहे.

आणि ज्याअर्थी उपविभागीय अधिकारी यांनी केलेल्या चौकशीअंती पाडा / वस्ती / पाडयांचा समुह / वस्त्यांचा समुह गाव घोषित करण्यास पात्र आहे, असे प्रस्तावित केले आहे. (चौकशी अहवालाची प्रत सोबत जोडली आहे)

आणि त्याअर्थी मी--------------------- जिल्हाधिकारी ---------------- उपविभागीय अधिकारी यांनी केलेल्या चौकशी बाबत समाधानी आहे. म्हणुन ----------- पाडा / वस्ती / पांडयांचा समुह / वस्त्यांचा समुह पेसा नियम -४ प्रमाणे गाव घोषित करण्याची शिफारस करीत आहे आणि संबंधित वाडा-पाडा-वस्तीस गाव म्हणुन घोषित करण्याची विनंती करीत आहे.

सर्व सर्वे क्रमांक, विभाग क्रमांक आणि इतर हद्दीच्या संदर्भातील विस्तृत तपशिल तसेच नकाशा सोबत जोडला आहे.

| अ.क्र. | हद्दीचे तपशिल | समुह नंबर/ कम्पार्टमेन्ट नंबर | इतर खुणा (आवश्यक असल्यास) |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |

असेही प्रस्तावित करण्यात येते की, सदर वाडया-वस्त्या-पाडयांना गाव जाहीर केल्यानंतर जाहीर केलेल्या गावांचे क्षेत्र वगळुन उरलेल्या क्षेत्र मुळ गाव म्हणुन ओळखले जाईल. या गावासाठी पेसा अधिनियमातील तरतुदी व नियमातील तरतुदी लागु राहतील व त्यांचे अधिकार अबाधित राहतील.

**स्वाक्षरी**

**दिनांक :** **जिल्हाधिकारी**

## अनुसूची-V

**महाराष्ट्र ग्रामपंचायती संबंधीचे उपबंध (अनुसुचित क्षेत्रावर विस्तारीत करण्याबाबत) नियम, २०१४ अंतर्गत नियम ४ अन्वये गाव जाहीर करण्यासाठी विभागीय आयुक्तांनी प्रसिध्द करावयाच्या अधिसुचनेचा नमुना.**

**अधिसूचना**

क्रमांक ------------ महाराष्ट्र ग्रामपंचायती संबंधिचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रावर विस्तारीत करण्याबाबत) नियम २०१४ च्या नियम ४ अंतर्गत प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन पाडा /पाडयांचा समुह वस्ती /वस्त्यांचा समुह, वाडी/वाडयांचा समुह गाव म्हणुन विनिर्दिष्ट करण्यात येते,

आणि ज्या अर्थी ----------------------- ग्रामपंचायतीतील पाडा / वस्ती / पाडयांचा समुह / वस्त्यांचा समुह यांनी महाराष्ट्र ग्रामपंचायती संबंधीचे उपबंध (अनुसुचित क्षेत्रावर विस्तारीत करण्याबाबत) नियम, २०१४ च्या नियम ४ प्रमाणे दिनांक ------------ रोजी गाव जाहीर करण्यासंदर्भात ठराव केलेला आहे.

आणि ज्याअर्थी उपविभागीय अधिकारी यांनी यासंदर्भात दिनांक ---------- रोजी --------- ग्रामपंचायतीत येणा-या पाडा / वस्ती / पाडयांचा समुह / वस्त्यांचा समुह यांची संबंधित नोंदणीकृत मतदार व स्थानिक अधिका-यांच्या उपस्थितीत चौकशी केली आहे.

आणि ज्याअर्थी जिल्हाधिकारी यांनी चौकशी अंती संबंधित पाडा / वस्ती / पाडयांचा समुह / वस्त्यांचा समुह यांना गाव घोषित करण्याची शिफारस केलेली आहे.

आणि त्याअर्थी मी श्री/श्रीम ---------------------------------- विभागीय आयुक्त -------------- पेसा नियमाच्या नियम ४ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन येथे पाडा / वस्ती / पाडयांचा समुह / वस्त्यांचा समुह यास पेसा नियम ४ अंतर्गत गाव घोषित करीत आहे.

सदर गावांच्या नैसर्गिक हद्दीचे तपशिल तसेच संबंधित नैसर्गिक साधनांच्या वापराची पारंपारिक हद्द खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | हद्दीचे तपशिल | समुह नंबर/ कम्पार्टमेन्ट नंबर | इतर खुणा (आवश्यक असल्यास) |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |

सदर गाव जाहीर केल्यानंतर जाहीर केलेल्या गावांचे क्षेत्र वगळुन उरलेल्या क्षेत्र मुळ गाव म्हणुन ओळखले जाईल. या गावासाठी पेसा अधिनियमातील तरतुदी व नियमातील तरतुदी लागु राहतील.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

**स्वाक्षरी**

**दिनांक :** **विभागीय आयुक्त**